

CONTEMPORARY ISSUES IN WOMEN'S STUDIES: A FEMINIST DISCOURSE
30 – 31 MARCH, 2015
ORGAINSED BY
Association of Indian Universities, New Delhi
In Association with
IDOL, University of Mumbai
&
Seva Sadan's College of Education, Ulhasnagar, Thane
Dr.Rajan Welukar,
Vice Chancellor, University of Mumbai
Will Preside over the Function
: Organizing Committee:
Dr. S. Rama Devi Pani, AIU, New Delhi
Dr. D. Harichandan, Director IDOL, University of Mumbai, Mumbai
Dr. (Mrs) Beena S Khemchandani, Principal, Seva Sadan's College of Education, Ulhasnagar
Venue: Sir Pherozeshah Mehta Hall,
University of Mumbai, Vidyanagari, Mumbai.
Time: 10.00 a.m.






IDOL, University of Mumbai
&
Seva Sadan's College of Education, Ulhasnagar, Thane
Dr.Rajan Welukar,


NATIONAL SEMINAR ON
WOMEN'S STUDIES: A FEMINIST DISCOURSE
MARCH, 2015
Association of Indian Universities, New Delhi
IDOL,
of Mumbai
Seva Sadan's
Ulhasnagar,





# कॉर्पोरेट जगाच्या वाढत्या प्रभावामुळे स्त्री प्रतिमा शरीरकेंद्री

## डॉ. रूपरेखा वर्मा यांची खंत



**युनिव्हर्सिटीन्यूज या साप्ताहिकाच्या विशेषांकाचे प्रकाशन लखनऊ विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. रूपरेखा वर्मा यांच्याहस्ते झाले. या वेळी उपस्थित मान्यवर.**

**मुंबई, दि. ३० (प्रतिनिधी) :** ''जरी जागतिकीकरणानंतर महिला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र झाल्या. असे त्यांना वाटत असले तरी कॉर्पोरेट जगाच्या प्रभावामुळे त्या शरीर-केंद्री स्वप्रतिमेत अधिकच जेरबंद झाल्या आहेत,'' अशी खंत लखनऊ विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. रूपरेखा वर्मा यांनी आज मुंबईत व्यक्त केली. भारतीय विद्यापीठसंघ, नवी दिल्ली, मुंबई विद्यापीठ व सेवासदन शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय 'महिलांच्या समकालीन समस्यांचा अभ्यास, स्त्रियांचे हक्क' विषयावरील राष्ट्रीय परिषदेत त्या बोलत होत्या.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, ''आपण आत्तापर्यंत प्रगतीच्या दृष्टीने काय पावले उचलली आहेत आणि आपल्याला किती पावले मागे यावे लागले आहे, याचे मूल्यमापन व्हायला हवे.'' असे सांगून त्या म्हणाल्या, ''महिलांचे काही प्रश्न बोथट झाले असले तरी, काही अधिक धारधार झाल्याचे दिसते. अधीच न सुटलेल्या प्रश्नांच्या यादीत आता अनेक नव्या प्रश्नांची भर पडली आहे,'' असे सांगून त्यापुढे म्हणाल्या, ''महिलांचे प्रश्न आता त्यांनी जन्म घ्यायच्या आधीच सुरू होतात. तिचा जन्माला येण्याचा अधिकारही नाकारला जातो आणि जर जन्म मिळालाच तर कसेतरी जिवंत राहाणे, आत्मप्रतिष्ठा मिळविणे, निर्णय प्रक्रियेतून वगळले जाणे, लिंगभेद, हिंसाचार अशा अनेक अडचणींची मालिकाहेच तिचे जीवन बनते. यामुळे स्त्रियांचे प्रश्न सोडविताना पुरूषांचा सहभाग असणे गरजेचे आहे.'' असे सांगून त्यापुढे म्हणाल्या, ''या प्रश्नांकडे मानवी हक्काचे प्रश्न म्हणूनच पाहिले पाहिजे.''

युनिस्कोच्या सल्लागार डॉ. सुषमा शेखर दत्त यांच्या भाषणात त्या म्हणाल्या, ''नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन यांनी महिलांच्या प्रश्नावर बोलताना, भारतीय समाजातून त्यांचे 'गायब' होणे चिंताजनक असल्याचे म्हटले होते.'' त्यांची आठवण करून देत त्या म्हणाल्या, ''सर्व स्त्रियांमध्ये तर्कसंगत विचारसरणी विकसित करणे गरजेचे आहे. काही प्रश्नांबाबत अत्यंत महत्त्वाचे ठरणारे पौगंडावस्थेतील मुलांचे वर्तन बदलण्यासाठी त्यांच्यात जाणीवजागृती निर्माण करणे आवश्यक आहे; पण ते होताना दिसत नाही. महिलांच्या सबलीकरणाची संकल्पना मोघम राहाते. तिचे शास्त्रशुध्द मूल्यमापन होताना दिसत नाही.''

भारतीय विद्यापीठ संघाच्या युनिव्हर्सिटीन्यूज या साप्ताहिकाच्या संपादिका डॉ. रमादेवी पाणी आपल्या संक्षिप्त भाषणात म्हणाल्या, ''आज शैक्षणिक समुदायासमोरचा खरा प्रश्न हा शिक्षक सामाजिक परिवर्तनाचा प्रमुख घटक ठरतो आहे का? आणि महिलाविषयक अभ्यासक्रमांमुळे महिलांचे प्रश्न सोडविण्यास मदत होते आहे का? हा आहे.''

तर मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजन वेळूकर म्हणाले, ''शासकीय व संस्थात्मक पातळीवर अनेक योजना राबवूनही महिलांच्या स्थितीत फारसा बदल दिसून येत नाही. महिलांच्या प्रश्नांबाबत खरा बदल जेव्हा समाज महिलांचे प्रश्न हे केवळ महिलांचे नसून संपूर्ण समाजाचे आहेत, असे मानेल तेव्हाच होऊ शकतो.''असे ते म्हणाले.

# SEMINAR AT IDOL, KALINA




**Mumbai:** The Institute of Distance and Open Learning (IDOL), University of Mumbai, hosted the 'National Seminar on Women's Issues' at Kalina campus on March 30. The conference is jointly organised by the Association of Indian Universities (AIU), MU and IDOL. Dr Roop Rekha Verma, former vice-chancellor of Lucknow University, delivered the keynote address at the seminar on 'Contemporary Issues in Women's Studies: A Feminist Discourse.'

# शरीर केंद्रित हो गई है महिला की छवि....



मुंबई. वैश्वीकरण के बाद महिलाएं आर्थिक तौर पर भले ही स्वतंत्र महसूस करें लेकिन कारपोरेट जगत के प्रभाव के चलते महिलाओं की छबि शरीर केंदित होती जा रही है।यह भावना मुंबई विश्वविद्यालय में आयोजित दो दिवसीय महिला सम्मेलन में लखनऊ विश्वविद्यालय की पूर्व कुलपति डसक्टर रूपरेखा वर्मा ने व्यक्त किया। वह भारतीय विश्वविद्यालय संघ दिल्ली और मुंबई विद्यापीठ तथा सेवा-सदन शिक्षण शास्त्र महाविद्यालय द्वारा महिलाओं की समकालीन समस्या विचार गोष्ठी में बोल रही थीं। उन्होंने कहा कि महिलाओं की समस्या को अलग न करके उसे एक वृहद मानवीय समस्या के रुप में देखा जाना चाहिए। यूनेस्को की सलाहकार डाक्टर सुषमा शेखर दत्त ने कहा कि नोबेल पुरस्कार विजेता अमर्त्य सेन द्वारा महिलाओं की समस्या पर उनकी चर्चा के दौरान भारतीय समाज का अनुपस्थित रहना चिंताजनक है। इससे लगता है कि महिला सशक्तिकरण की कल्पना को लेकर हम गंभीर नहीं हैं। भरतीय विश्वविद्यालय संघ के साप्ताहिक युनिवर्सिटी न्यूज की संपादिका डाक्टर रमा देवी पांणी ने कहा कि आज यह सवाल खड़ा हो गया है कि शिक्षक सामाजिक परिवर्तन का प्रमुख घटक है कि नहीं। इस अवसर पर कुलपति राजन वेलुकर के अलावा देश भर के प्रसिद्ध विश्वविद्यालयों के शिक्षाविद और महिला मामलों के विशेषज्ञ शामिल थे।